# भारतीय संस्कृती


लेखक

भारताचार्य, धर्मभूषण

**प्रा. सुरेश गजानन शेवडे**

एम्.ए., एम्.एड.

**भ्रमणध्वनी ९८६७६२१७५१**



धर्मसेवा प्रकाशन, चेंबूर, मुंबई ४०० ०७१

# अनुक्रमणिका


प्रास्ताविक ........................................ ७

१. भारतीय संस्कृतीतील व्यक्तिजीवन ........................ ९

२. भारतीय संस्कृतीतील कुटुंबजीवन ........................ १८

३. भारतीय संस्कृतीतील समाजजीवन ........................ २४

४. भारतीय संस्कृतीतील राष्ट्रजीवन ........................ ३३

५. भारतीय संस्कृतीतील स्त्री-जीवन ........................ ५४

६. भारतीय संस्कृतीतील धार्मिक जीवन ........................ ६७

७. पुनर्जन्म विचार ........................................ ८०

८. गोपालन ........................................ ८८

९. भारतीय इतिहासातील गोंधळ ........................ ९९

१०. शैक्षणिक जीवन ........................................ १११

११. काही स्फुट विषय ........................................ ११७

१२. संदर्भग्रंथ ........................................ १२७

# भारतीय संस्कृती

## प्रास्ताविक

---

परंपरागत आदर्श आचार-विचारपद्धती म्हणजे संस्कृती. भारतीय समाजाची हजारो वर्षांपासून चालत आलेली, परंपरागत, आदर्श, उत्तम वाटणारी अशी जी वागणुकीची आणि विचार करण्याची पद्धती तिला भारतीय संस्कृती असे म्हणता येईल.

सर्वसामान्य भारतीय माणसांचा विचारांचा धागा हजारो वर्षांपासून अनुस्यूतपणे व अखंडपणे सारखाच आहे. दुसऱ्याची वस्तू ही आपली नाही, ती आपण संमती न घेता उचलून आणणे ही चोरी आहे, आणि ती चांगली नाही, हे भारतीय चोरालाही मान्य आहे. दारू पिणे निषिद्ध आहे हे भारतातल्या अट्टल दारुड्याला सुद्धा पटते. आई-वडिलांचा आदर करावा, मोठ्या माणसांचा मान राखावा, देव आपल्यावर नित्य नजर ठेवून असतो म्हणून त्याला आवडेल असेच वागावे, देवाला न आवडणारे कर्म म्हणजे पाप, परोपकार हे पुण्यकर्म आहे, कर्तव्य पार पाडणे हे पुण्यकर्म नाही, ते आवश्यक कर्म आहे, इत्यादी विचार भारतातील सर्व जाती-पंथांच्या लोकांना सारखेच पटतात. अशा प्रकारे विचार करणे, या विचारांना आदर्श मानणे, हजारो वर्षांपासून आदर्श मानत राहणे हे भारतीय संस्कृतीचे लक्षण आहे.

अशा आपल्या हजारो वर्षांच्या प्राचीन व साऱ्या जगाला कौतुकाचा विषय वाटणाऱ्या संस्कृतीची आपल्या पुढच्या पिढीला सोप्या भाषेत व सोप्या पद्धतीने तोंडओळख करून द्यावी हा या पुस्तकलेखनाचा हेतू आहे. सध्या आपल्या मूळ संस्कृतीचा धागा दुरावल्यागत होऊ लागला आहे. या संस्कृतीला हानी पोहोचावी

असा हेतुपुरस्सर प्रयत्न काही संघटनांकडून होत असल्याचे जाणवत आहे. आपल्याच काही जीवनमूल्यांचा अवमान करण्यात येत असून आदर्शांनाच धक्का पोहोचवला जात आहे. अशा परिस्थितीत मोठमोठ्या शास्त्रग्रंथांचे तर सोडाच पण साधुसंतांच्या मराठी सोप्या ग्रंथांचे दर्शन- सुद्धा जीवनभरात न घडणारा समाज या देशात उत्पन्न होत आहे आणि वाढत आहे.

आई-वडिलांकडून तरी आपल्या संस्कृतीचे चांगले संस्कार व्हावेत; पण ती आशाही दुर्दैवाने दुरावत चालली आहे. व्यसनात आणि जुगारात आकंठ बुडालेला बाप आणि वेळी-अवेळी क्लब, पार्ट्या, अभक्ष्यभक्षण, अपेयपानांत रमलेली आई ज्यांच्या कपाळी लिहिलेली असेल अशा दुर्दैवी जीवांच्या जीवनात 'संस्कृती' हा शब्दसुद्धा येणे कठीण. सुदैवाने भारतातील सर्वसामान्य माणूस इतका घसरलेला नाही, हे जरी खरे, तरी या अधःपतनाला मोठ्या प्रमाणात आरंभ झाला आहे हे नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत आमच्या नव्या पिढ्यांना आमचे आदर्श भारतीय जीवन कळावे तरी कसे ? कळलेच तर ते पटावे तरी कसे ? अशा विचारांनी मन उद्विग्न होते. पण It is better to lit a candle than to curse darkness (अंधार अंधार म्हणून रडत राहण्यापेक्षा निदान एक तरी दिवा प्रथम लावावा, हे बरे) या विचाराने हे छोटेसे पुस्तक आमच्या नव्या पिढीला केवळ भारतीय संस्कृतीची तोंडओळख व्हावी म्हणूनच लिहून प्रकाशित करीत आहोत.

—प्रा. सु. ग. शेवडे

डी- १२४, गावठाण,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१
दूरध्वनी क्र. (०२२) २५२८ ४२७४